www. sahyandrinews.com

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २४३ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.१४ जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# बारामतीची निवडणूक देशात गाजली

# प्रचारकाळात लोक बोलत नव्हते

## पण त्यांनी शांतपणे बटण दाबले;शरद पवार यांचे प्रतिपादन

**पुणे (वृत्तसंस्था)–राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी गुरुवारी प्रथमच बारामती लोकसभा मतदार संघातील निवडणुकीतील आपल्या पक्षाच्या विजयावर भाष्य केले आहे. बारामती लोकसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी लोक फार काही बोलत नव्हते. त्यांनी नको त्या गोष्टींपासून स्वत:ला दूर ठेवले. पण मतदानाच्या वेळी इथले एकही गाव मागे राहिले नाही. त्यांनी शांतपणे बटण दाबले, असे ते म्हणाले.**

शरद पवार यांनी गुरुवारी बारामती येथील शिर्सुफळ गावच्या गावकऱ्यांशी संवाद साधला. त्यात त्यांनी उपरोक्त विधान केले. ते म्हणाले की, काही लोकांना वाटते की बारामतीत चमत्कार झाला. परंतु एवढी चर्चा व्हायचे कारण नाही, बारामतीच्या निवडणुकीची चर्चा होण्याचे खरे कारण म्हणजे स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. कारण त्यांनी या निवडणुकीत लक्ष घातले होते, निवडणुकीत ज्या गोष्टी मांडायच्या नसतात, बोलायच्या नसतात त्या त्यांनी जाहीरपणे बोलून दाखवल्या. त्यामुळेच या सगळ्या गोष्टींची अधिक चर्चा झाली असे शरद पवार यांनी म्हटले आहे. दरम्यान शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, मी आजवर अनेक निवडणुका लढलो आहे. खरंतर मी किती निवडणुका लढलो हे मला आठवतही नाही. सुरुवातीच्या काळात मी मते मागण्यासाठी तुमच्याकडे आलो. मात्र नंतरच्या काळात मी फक्त कामातून तुमच्या संपर्कात राहिलो. मी मते मागायला आलो नाही. परंतु, तुम्ही मतदान कधी चुकवले नाही. तुम्ही तुमचे काम चोख करत आला आहात. अजूनही करत आहात. परंतु, या वेळच्या निवडणुकीत



परिस्थिती थोडी वेगळी होती. त्या परिस्थितीही तुम्ही माझ्या अपेक्षेप्रमाणे मतदान केले.शरद पवार म्हणाले की,देशाच्या दृष्टीने महत्त्वाची निवडणूक होती. आम्ही आघाडी म्हणून लढलो. राज्यात ४८ जागांपैकी ३० जागा जिंकल्या. एनसीपीने मुद्दाम कमी जागा लढण्याचा निर्णय घेतला. १० जागा घेतल्या ८ जिंकल्या. त्यात तुमचा वाटा होता. बारामती निवडणूक देशात गाजली. निवडणूक काळात सगळे लोकं काम करत होते. पण काही गावातील लोकं दडपण असल्यासारखे वागत होते ते पुढे येत नव्हते. काही लोकं सुरुवातीला सोबत आले आणि परत गायब झाले. या निवडणूकीत अनेक जण दिसले नाहीय. लोक मनात असेल ते करतात, दाखवत नाहीत. शांतपणे तुम्ही बटण दाबले. बारामती तालुक्याने सर्वात जास्त मतदान दिलं. त्यामुळे तुमचे आभार.शरद पवार म्हणाले की, जगभरातील अनेकांचे लक्ष बारामतीकडे लागले होते. अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरातला एक भाग आहे, जिथे जगभर काय काय चालले आहे त्याचे पोस्टर किंवा बोर्ड लावले जातात. तिथल्या एका बोर्डवर बारामतीच्या निवडणुकीची माहिती होती. म्हणजे बघा बारामती कुठपर्यंत पोहोचली आहे. अगदी न्यूयॉर्कपर्यंत तुम्ही पोहोचला आहात. याचा अर्थ लोकांचे निवडणुकीकडे लक्ष होते आणि त्याचा परिणाम निकालातून दिसून आला.

## थोडक्यात

### विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाचा यलो अलर्ट

**पुणे**–राज्यात सध्या मान्सूनची जोरदार बॅटिंग सुरू आहे. खान्देश, पूर्व विदर्भाचा काही भाग सोडून राज्याच्या बहुतांश भागात मोसमी वारे पोहोचले आहेत. अनेक ठिकाणी मुसळधार पावसाच्या सरी कोसळत आहेत. त्यातच आजही विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रामध्ये काही ठिकाणी विजांसह वादळी पावसाचा येलो अलर्ट हवामान विभागाने दिला आहे. तर हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार १४ जून पर्यंत राज्यात दररोज भाग बदलत पाऊस पडणार आहे. हवामान खात्याकडून, मुंबई, रायगड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये आज मध्यम पावसाची शक्यता आहे. तर धाराशिव, लातूर, बुलडाणा, पुणे, नगर, सोलापूर, अकोला, अमरावती, वाशीम, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा या जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता आहे.

### १६ जून रोजी जिवती येथे ग्राम न्यायालयाचे उद्घाटन

**चंद्रपूर**–उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे न्यायमुर्ती तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालक न्यायमुर्ती यांच्या हस्ते जिवती येथे १६ जून २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता ग्राम न्यायालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश समृध्दी भीष्म यांच्यासह राजुरा तालुका अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ड राजेश लांजेवार, ग्राम न्यायालय जिवतीचे न्यायाधिकारी सुहास बेलसरे उपस्थित राहणार आहेत.


### महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे एक दिवसीय आंदोलन

पुलगाव – महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने १५ जूनला विद्यार्थी हिताच्या विविध मागण्यांसाठी एक दिवसीय आंदोलन आयोजित केले आहे. शैक्षणिक गुणवत्तेच्या नावावर शैक्षणिक कामासह अनेक उपक्रम राबविले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे शिक्षकांची जनमाणसामध्ये प्रतिमा मलिन होण्यास हातभार लागत आहे. या सर्व उपक्रमामुळे शिक्षकांना शिकवण्यास व विद्यार्थ्यांना शिकण्यास अडचण निर्माण होत आहे. शासनाकडून मात्र याकडे सतत दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने संपूर्ण राज्यामध्ये दुपारी दोन ते चार एक दिवशी आंदोलन आयोजित केले आहे. वर्धा जिल्ह्यामध्ये सुद्धा समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद वर्धा कार्यालयासमोर आंदोलन होणार आहे, शिक्षक बंधूं भगिनींनी यात सहभागी व्हावे,असे आवाहन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे वर्धा जिल्हा अध्यक्ष अजय बोबडे यांनी केले आहे.

### शकुंतलाबाई गजपुरे यांचे निधन

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड येथील माजी जिल्हा परिषद सदस्य संजय गजपुरे व ब्रम्हपुरी येथील होमिओपॅथी प्रसिद्ध डॉ. विलास गजपुरे यांच्या



मातोश्री शकुंतलाबाई होमराज गजपुरे यांचे वृद्धापकाळाने रविवारी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ९० वर्ष होते. नागभीड येथील हिंदु स्मशानभुमीत त्यांचेवर अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांचे पश्चात मुले,मुली, सुना, नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे. गजपुरे यांच्या दु:खात सह्याद्रीचा राखणदार परिवार सहभागी आहे.

## प्री–पेड विद्युत मीटर गरीबांना आर्थिक भुर्दंड देणारे–डॉ.अंकुश आगलावे

**वरोरा । प्रतिनिधी**

प्री-पेड विद्युत मीटर गरीबांना आर्थिक भुर्दंड देणारे असून ते तात्काळ लावणे बंद करण्याची मागणी केंद्रीय मानवाधिकार संगठनचे विदर्भ प्रदेश अध्यक्ष डॉ. अंकुश आगलावे यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना निवेदनातुन केली आहे.

महाराष्ट्र शासनाने सध्या घरोघरी रिचार्ज मीटर लावण्याची सुरूवात केलेली आहे. जुन्य वीज मीटरमुळे नागरिकांना थकीतत वीज बील भरण्यासाठी मुभा मिळत होती मात्र आता रिचार्ज मीटरमुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागणार आहे. रिचार्ज न केल्यास वीजपुरवठा खंडीत केला जाणार आहे. तसेच गोरगरीब जनतेवर आर्थिक भुर्दंड बसणार आहे. तसेच रिचार्ज मीटर लावण्याचा खर्च हा ग्राहकांकडूनच वसुल करणार आहे. त्यामुळे ग्राहकांना आता जादाचे पैसे



मोजावे लागणार आहे. यामुळे वीज रिडींग घेणाऱ्या कर्मचारी व बिल वितरीत कर्मचारी बेरोजगार होणार आहे. याचा परिणाम होणार आहे. वीज सामान्य नागिरकांची प्राथमिक गरज असून सरकारने माफक दराने वीज पुरवठा करणे आवश्यक आहे. परंतु केंद्र सरकार व राज्यसरकारच्या धोरणामुळे वीज ग्राहकांचे जगणे कठीण होणार आहे.

## नीट परीक्षा प्रकरणाचे वर्धेत पडसाद;अभाविपची तीव्र निदर्शने

**वरोरा । प्रतिनिधी**

मेडिकल पाठ्यक्रम प्रवेशाच्या नीट मध्ये झालेल्या घोळाच्या प्रकरणावरून अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आक्रमक झाली असून बुधवारी वर्धा शहरातील छत्रपती चौकात सुद्धा अभाविप वर्धा नगर शाखेने तीव्र स्वरूपाचे निदर्शन केले. पदवी पाठ्यक्रमाच्या नीट-२०२४ मध्ये राष्ट्रीय चाचणी संस्थेने स्वतःची अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार उघड केला असल्याचा घणाघाती आरोप अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने केला.

परीक्षेत गोंधळ झाल्याने परीक्षा प्रक्रियेची आणि निकालाची तात्काळ सीबीआय चौकशी होऊन, दोषींवर कठोरात कठोर कारवाई व्हावी अशी मागणी अभाविप वर्धा नगरमंत्री हर्ष वानखेडे यांनी केली आहे. ऐन लोकसभा निवडणूक निकालाच्या दिवशीच नीट चा निकाल जाहीर करून एनटीए ला



काय लपवयाचे होते ? असा प्रश्न सुद्धा हर्ष वानखेडे यांनी एनटीएला केला. परीक्षेच्या दिवशी देशातील विविध भागांत बराच गोंधळ आढळला, प्रश्नपत्रिका वाटपात सुद्धा घोळ झाला असल्याने नीटच्या परीक्षार्थ्यांना न्याय मिळाला अशी मागणी अ.भा.विद्यार्थी परिषदेने धरून ठेवली आहे. वैद्यकीय संस्थानांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेच्या पारदर्शकतेवर विद्यार्थ्यांमध्ये संशय आहे. बराच घोळ झाल्याने राष्ट्रीय चाचणी संस्था अपयशी ठरल्याचेही स्पष्ट झाले. बुधवारी शहरातील छत्रपती चौकात निदर्शन झाले. यावेळी अभाविप जिल्हा संयोजक वैभव राऊत, नगरमंत्री हर्ष वानखेडे तसेच कुणाल हिवसे, हार्दिक घोडे, वेदांत सत्रे, उज्वल मसने, बादल लोखंडे, सौम्य तराळे, वेदांत बावनकर, गौरव पोहाने, आदित्य अतकर, अभिषेक द्विवेदी, साहिल इंगळे, सुजान चौधरी, मयंक उपाध्याय, दुर्गेश साठवणे, अभिषेक देवर आणि मोठ्या संख्येने नीट परीक्षार्थी व विद्यार्थी उपस्थित होते.

> नीट परीक्षेच्या निकालात एकाच केंद्रातून ६७ टॉपर आल्याने विविध शंका उपस्थित झाल्या आहे. भावी डॉक्टर यामुळे अस्वस्थ झाले असून राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या पारदर्शकतेवर संशयाची परिस्थिती तयार झाल्याने नीट परीक्षेचे पावित्र्य धोक्यात आहे.
>
> **–हर्ष वानखेडे, नगरमंत्री, अभाविप वर्धा.**

## रविवारी गोंडपिपरीत महा आरोग्य शिबीराचे आयोजन

**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**

सुधीर मुनगंटीवार सेवा केंद्र, भाजपा जनसंपर्क कार्यालय तथा आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी(मेघे) यांच्या संयुक्त आयोजनातून रविवारी (दि. १६ जून) गोंडपिपरी येथील कला, वाणिज्य महाविद्यालयात भव्य महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरामध्ये जवळपास सर्वच प्रकारच्या आजारांचे निदान, उपचार व शस्त्रक्रिया नि:शुल्कपणे करून देण्यात येणार आहेत.अशी माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. सदर शिबीर सकाळी ९ वाजेपासून सुरू होणार असून याठिकाणी आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी (मेघे) येथील मेडिसीन, नेत्ररोग, सर्जरी, बालरोग, स्त्रिरोग, कान-नाक-घसा, अस्तिरोग आणि त्वचारोग यांसारख्या रोगांवरील तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती राहणार असून याठिकाणी सर्व चाचण्या व मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करून देण्यात येणार आहे. त्यासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून नागरिकांनी सेवा केंद्रात जाऊन तसेच तालुका भाजपा कार्यालयात आपल्या नावाची नोंद करावी आणि शिबीरात येतांना आधारकार्ड व केशरी किंवा पिवळे रेशनकार्ड सोबत आणावे. असेही आवाहन सुधीर मुनगंटीवार सेवा केंद्र तथा भाजपा जनसंपर्क कार्यालयातकडून करण्यात आले आहे.

## नदीत बुडून दोन मित्रांचा मृत्यु

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील घुबडटोळी परिसरातील दोन मित्र नदीत बुडून मरण पावले.एक, दोन घर शेजारी राहणारे हे मित्र असून दोघेही मजुरी काम करणारे व दारू पिण्याच्या सवयीचे होते.


दिनांक १२ जून २०२४ चे दुपारी ११वाजता दोघेही जण मजुरी कामाने घराबाहेर पडले. सायंकाळपर्यंत घरी परत न आल्याने दोन्ही मृताच्या नातेवाईकांनी त्यांचा शोध घेतला असता दि.१३ ला पुलगाव येथील वर्धा नदीवरील डॅम पुलगाव जवळील पाण्यात दोघांचेही मृतदेह पाण्यावर तरंगताना दिसले. दोन्ही मृतक हे पोहण्यासाठी पाण्यात उतरले असता पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने दोघांचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला असावा. दोघांनाही पोहणे येत नव्हते. फिर्यादीच्या रिपोर्ट वरून सदरची माहिती चौकशीत घेण्यात आली . मृतकाच्या मरणाबाबत मृतकाच्या नातेवाईकांचा कोणावरही कोणत्याही प्रकारचा संशय नाही.पुलगाव पोलिस स्टेशन मध्ये ५५/२४ कलम १७४ सी आर पी सी नुसार गुन्हा नोंद करण्यात आला. मृतकाचा मोठा भाऊ शंकर लक्ष्मण लाडेकर( वय ७२वर्ष),रा. घुबड टोली,पुलगाव जिल्हा वर्धा.व्यवसाय मजुरी.याने फिर्याद दाखल केली.मृतक सुरेश लक्ष्मण लाडेकर ( वय ५७ वर्षे ) व गणेश बन्सी चचाणे अंदाजे वय ५५ वर्ष रा. घुबडटोली, पुलगावअशी आहेत.

**नागभीड येथील दिव्यांग पंकज नागोसे वय ३६ वर्ष दिवसभर उन्हातान्हात सध्या अगरबत्ती विकून आत्मनिर्भर बनलाय. त्याच्या डोक्याचं तोल बरोबर राहत नाही. पायाने चालता येत नाही. स्पष्ट बोलता येत नाही. मात्र चेहऱ्यावर कोणतेही रडगाणे नाही.यावेळी पंकज तुझ्या कार्याला त्रिवार अभिवादन!असे मनात आल्याशिवाय राहत नाही. छाया :प्रणय बांगरे.**






# रक्तदाता होउया का आपण?




रक्तदान केल्याने आपल्या शरीरावर कोणताही दुष्परिणाम होत नाही. जे लोक ऐच्छिक रक्तदान करून जीवनदान करतात, त्यांचे आभार मानणे व नवीन लोकांना रक्तदानास प्रवृत्त करणे, असे जागतिक रक्तदाता दिवसाचे प्रमुख उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. दरवर्षी १४ जून रोजी संपूर्ण जगातील रक्तदात्यांचा सन्मान दिवस म्हणून जागतिक स्तरावर साजरा केला जातो. रक्त संक्रमणासाठी सुरक्षित रक्त व रक्त उत्पादनांची आवश्यकता, राष्ट्रीय आरोग्य यंत्रणेत स्वयंसेवी आणि विनाअनुदानित रक्तदात्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाविषयी जागतिक जागरूकता वाढविणे, हाही यामागील हेतू आहे. हा दिवस सरकार आणि राष्ट्रीय आरोग्य अधिकाऱ्यांना आवश्यक संसाधने उपलब्ध करून देण्यासाठी, स्वेच्छा, मोबदला न मिळालेल्या रक्तदात्यांकडून रक्त संग्रह वाढविण्यासाठी तसेच यंत्रणा व पायाभूत सुविधा तयार करण्यासाठी कृती करण्याची संधी प्रदान करतो.

शास्त्राप्रमाणे जीवनदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. सामान्य व्यक्तीही रक्तदान करून दुसर्याचा जीव वाचवू शकते. आज संपूर्ण जगभरात जागतिक रक्तदाता दिन साजरा होत आहे. रक्तदात्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी सन २००४पासून जागतिक आरोग्य संघटना १४ जून रोजी जागतिक रक्तदाता दिवस साजरा करत असते. आजदेखील समाजात रक्तदान करणाऱ्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे रक्तदात्याला रक्तदानास प्रेरित करण्याच्या अनुषंगाने व नियमित रक्तदात्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी २००४पासून जागतिक आरोग्य संघटना हा दिवस साजरा करत असते. ए–बी–ओ या रक्तगटांचा शोध लावणारे आणि रक्तदान संकल्पनेला अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडणारे ऑस्ट्रियाचे शरीरविज्ञानात नोबेल पारितोषिक प्राप्त डॉ.कार्ल लॅन्डस्टेनर यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस जागतिकस्तरावर साजरा केला जातो. डॉ.कार्ल लॅन्डस्टेनर यांचा जन्म दि.१४ जून १८६८ रोजी ऑस्ट्रियात झाला. त्यांचीच आज जयंती जागतिक रक्तदाता दिन म्हणून पाळण्यात येत आहे. हा दिवस सर्वप्रथम सुरू करण्याकरीता दि.१४ जून २००४ रोजी जागतिक आरोग्य संघटना, रेडक्रॉस आणि आंतरराष्ट्रीय रेड क्रॉसेंट सोसायटी ऑफ इंटरनेशनल फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रयत्न करण्यात आले होते. स्वेच्छेने व मोबदला न घेता सुरक्षित रक्तदान करण्याच्या गरजेबद्दल जनजागृती व्हावी, या उद्देशाने साजरा करण्यात आला. मे २००५मध्ये डब्ल्यूएचओने एका जागतिक आरोग्य असेंब्लीच्या जागतिक रक्तदाता दिनानिमित्त १९२ सदस्य देशांसह अधिकृतपणे समितीची स्थापना केली. जेणेकरुन जगातील सर्व देशांना रक्तदात्यांच्या बहुमोल कृतीबद्दल आभार मानण्यास आणि लोकांचे जीवन वाचवण्यास प्रवृत्त केले जाईल. हा दिवस साजरा करण्याची उद्दिष्टे लोकांना रक्तदानासाठी प्रोत्साहित करणे आणि त्याच्याशी संबंधित गैरसमज दूर करणे आहे.



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.**



अपघातात झालेला अतिरिक्त रक्तस्राव, पॅलेसोमिया, रक्तक्षय, रक्ताचा कर्करोग, प्रसूतिपश्चात रक्तस्राव, शस्त्रक्रिया आणि इतर गंभीर आजारांमधे योग्यवेळी रुग्णाला रक्त मिळाले नाही तर तो रुग्ण दगावण्याची शक्यता असते. अशावेळी एका मानवाचेच रक्त दुसऱ्या मानवाचे प्राण वाचवू शकते. कारण मानवाचे रक्त कोणत्याही कारखान्यात तयार होत नाही व दुसऱ्या कोणत्याही प्राण्याचे रक्त मानवासाठी उपयोगात येऊ शकत नाही. त्यामुळे रक्तदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. महाराष्ट्र राज्यात रुग्णांसाठी दरवर्षी सुमारे साडेसात लाख बाटल्या रक्त लागते. ही गरज ७० ते ७५ टक्के पर्यायी बदली रक्तदाता किंवा व्यावसायिक रक्तदात्याकडून भागविली जाते. मानवाच्या शरीरामध्ये साडेचार ते पाच लिटर रक्त असते. रक्तदानाच्या वेळी केवळ ३०० मिली रक्त काढले जाते. प्रत्येक रक्तदानानंतर साधारण ३६ तासांमध्ये शरीरात रक्ताची पातळी पूर्ववत होते. तसेच साधारण २ ते ३ आठवड्यांत रक्तपेशीही पूर्ववत होतात. रक्तदान केल्याने कोणताही त्रास किंवा इजा होत नाही. ब्लड बँकेच्या रेफ्रिजरेटरमध्ये फक्त ४–५ आठवड्यांपर्यंत रक्त सुरक्षित ठेवता येते. रक्तदानामुळे प्रत्येक वर्षी अनेकांना जीवनदान मिळते. अनेक मोठ्या सर्जरींमध्ये किंवा गंभीर परिस्थितीत रक्तदानामुळे रुग्णाचे प्राण वाचण्यास मदत होते. तसेच गरोदरपणात बाळाचे आणि आईचे प्राण वाचविण्यास रक्तदान महत्त्वाचे कार्य करते. आपल्या भारत देशात १२० कोटी लोकसंख्या असूनही केवळ ७४ लाख ते १ कोटी २० लाख लिटर रक्त संकलित होते. रक्त न मिळण्यामुळे मृत्यूचे प्रमाण देशभरात १५ ते २० टक्के आहे. भारतात केवळ ०.६ टक्के लोक रक्तदान करतात.

रक्तदान हे एखाद्या व्यक्तीने स्वेच्छेने अंगातून रक्त काढून देण्याची क्रिया आहे. असे रक्त रुग्णाच्या शरीरात चढवण्यापूर्वी बायोफार्मास्युटिकल प्रक्रियेद्वारे त्याचे विभाजन केले जाते व संपूर्ण रक्त किंवा रक्ताचा आवश्यक तोच घटक त्याच्या शरीरात इंजेक्ट केला जातो. रक्त संकलन प्रक्रियेत ब्लड बँक– रक्त बँकांचा सहभाग असतो. बहुतेक रक्तदाते– स्वयंसेवक स्वखुशीने अणि विनामोबदला रक्तदान करतात. काही देशांमध्ये रक्ताचा पुरवठा मर्यादित आहे. कारण देणगीदार फक्त नातेवाईकांसाठी किंवा मित्रांसाठीच रक्त दान करतात. अनेक रक्तदाते रक्तदान एक देणगी म्हणून करतात. परंतु ज्या देशांमध्ये रक्त विकण्याची परवानगी आहे, तिथे रक्तदात्यांना पैसे मिळतात. रक्तदानासाठी काही ठिकाणी कामकाजावरून मोकळा वेळ दिला जातो.

वयाच्या १८ वर्षानंतर ते ६५ वर्षांपर्यंत, वजन ४५ किग्रॅच्या वर असल्यास, रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमीत कमी १२.५ ग्रॅम असल्यास, रक्तदाता पूर्णपणे निरोगी असल्यास, अशा निरोगी माणसाला दर ३ महिन्यांनी जवळच्या रक्तपेढीत किंवा कोठेही आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात रक्तदान करता येते. तर रक्तदात्याने आधीच्या ३ दिवसांत कोणतेही प्रतिजैविक औषध घेतलेले असल्यास, रक्तदात्याला मागील ३ महिन्यात मलेरिया झाला असल्यास, रक्तदात्याला मागील १ वर्षात विषमज्वर, कावीळ किंवा श्वानदंश होऊन त्याने रेबीजची लस घेतली असल्यास, त्याची ६ महिन्यापूर्वी मोठी शस्त्रक्रिया झाली असल्यास, गर्भवती महिला, महिलेला १ वर्षाखालील मूल असल्यास किंवा तिचा ६ महिन्यात गर्भपात झाला असल्यास अशांना रक्तदान करता येत नाही. ब्लड प्रेशर लो किवा हाय असणाऱ्यांनी रक्तदान करताना रक्तदाबाची चाचणी करून पहावी, उपाशी पोटी किवा खाऊन झाल्यावर अर्ध्या तासापर्यंत रक्तदान करू नये. तसेच रक्तदानास इच्छुक असणारास इतरही आजारांची चाचणी करून घ्यावी लागते.

सद्या तर आपल्या देशात वर्षभरच रक्तदान शिबीरे आयोजित करून भरपूर रक्तसंकलन केले जात आहे. सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक, सेवाभावी संस्था रक्तदान शिबीरांच्या माध्यमातून संकलीत रक्तसाठा रक्तपेढ्यांकडे सुपूर्द करीत असतात. गरजूंना रक्त वेळेत मिळत नाही. प्रसंगी आर्थिक टंचाईच्या कारणाने गरीबांना प्राणानिशी मुकावे लागत आहे. मग एवढा संकलीत रक्तसाठा जातो तरी कुठे? रक्ताचा काळा बाजार होत नाही ना? हा संशोधनाचा विषय होऊन बसला आहे. नेहमीच आरोग्य विभागाची बोंब ऐकू येते, की रक्तपेढीत रक्तच उपलब्ध नाही. याकडे आज निक्षून लक्ष घालण्याची गरज असल्याची ओरड गरीब व सर्वसामान्य जनतेतून होणे साहजिकच आहे.!! समस्त रक्तदात्यांना विश्व रक्तदाता दिनाच्या प्रेरणादायी हार्दिक शुभेच्छा !!

## युवा सामाजिक कार्यकर्ता

# निखिल मांडवकर

### जाणवाया दुर्बलांचे दु:ख आणि वेदना ।
### तेवत्या राहो सदा रंध्रातुनी संवेदना ।।

**या पंक्तीप्रमाणे थोर समाजसेवकांच्या कृतीशील विचारांनी प्रेरित होऊन वरोरा येथील एका तरुणाने समजसेवेची मशाल हाती घेतली आहे . या तरुणाने समाजातील वंचित, निराधार, उपेक्षित लोकांच्या जीवनातील अंधारलेल्या वाटेत प्रकाश बिजे पेरण्याची कामे मोठ्या उत्साहाने करत आहे . असा हा युवा सामाजिक कार्यकर्ता म्हणजे निखिल चंद्रकिशोर मांडवकर .**



स्वत:साठी जगता जगता दुसऱ्यांसाठीही जगता यायला हवं. कारण दुसऱ्यांसाठी जगताना आपल्या मनाला एक प्रकारचे समाधान मिळत असते. असे विचार घेवून निखिल ने बालवयापासून समाजकार्याला सुरुवात केली . वयाच्या सोळाव्या वर्षी आपल्या समविचारी मित्रांना सोबत घेवून त्याने सेवा ग्रुप फाउंडेशन या संस्थेची २२ ऑक्टोंबर २०१९ ला स्थापना केली . या संस्थेच्या माध्यमातून वृद्धाश्रमात वृद्धांना ब्लँकेट्स व आवश्यक वस्तूंचे वाटप. वरोरा तालुक्यातील होतकरू ,गरजू विद्यार्थ्यांना बुक पुस्तके वाटप. वृक्षारोपण, प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळांमधील देशभक्ती जागृत कार्यक्रम. शिवजयंती उत्सव, कोरोना काळात तालुक्यातील शाळांमध्ये मास्क वाटप, रक्तदान शिबिर, कोरोना काळात ३१ दिवस गरजूंना अन्न वाटप व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, असे विविध उपक्रम राबवून आपल्या कार्याची छबी त्याने उमटवली आहे.

या कार्याची दखल घेऊन विविध सामाजिक संघटनांकडून त्याचा कोरोना योद्धा म्हणून तसेच सामाजिक कार्यात उत्कृष्ट कार्य केल्यामुळे त्याला सन्मानित करण्यात आले आहे. या काळात त्याच्यावर ओबीसी विद्यार्थी तालुका अध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली होती. या कार्यकाळात त्याने विद्यार्थ्यांसाठी विविध आंदोलन करून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. आता तो राजकारणात सक्रिय झाला असून शिवसेना (उ बा ठा) जिल्हाप्रमुख मुकेश जीवतोडे यांच्या नेतृत्वात शिवसेनेत युवासेना विधानसभा समन्वयक म्हणून कार्य करीत आहे. अशा या हरहुन्नरी युवकाचा आज वाढदिवस त्याला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

**संपादक**
**आशिष मारोती घुमे**

# जालन्याचे जितेंद्र अग्रवाल यांची ऐतिहासिक कामगिरी

## दक्षिण आफ्रिकेत कॉम्रेड मॅरेथॉन यशस्वीरित्या पूर्ण

**डर्बन (द. आफ्रिका)**–जालना येथील व्यावसायिक व धावपटू जितेंद्र अग्रवाल यांनी दक्षिण आफ्रिकेत डर्बन येथे ९ जून रोजी कॉम्रेड मॅरेथॉन ही ८७ किलोमीटरची स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण करून इतिहास घडवला आहे. या जगप्रसिद्ध व प्रतिष्ठित अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये धावणारे जालना येथील पहिले धावपटू होण्याचा मान ५३ वर्षीय जितेंद्र अग्रवाल यांनी मिळवला आहे. १२ तासांत ८७ किलोमीटर धावण्याचे लक्ष्य त्यांनी ११ तास ४२ मिनिटे व ३२ सेकदांत पूर्ण करून अनोख्या मनोबलाचे दर्शन घडवले आहे. या स्पर्धेत धावणे व ती पूर्ण करणे हे जगभरातील धावपटूंचे स्वप्न असते. याच डर्बन शहरात महात्मा गांधी यांचे काही काळ वास्तव्य होते हे विशेष. या स्पर्धेसाठी जितेंद्र अग्रवाल जालना येथून ४ जून रोजी मुंबई व तेथून ५ जून रोजी सकाळी ४.३० वाजता डर्बनला विमानाने निघाले आणि संध्याकाळी ७ वाजता डर्बन येथे पोहचले. त्यांच्यासोबत महाराष्ट्रातून जाणारे ४० सदस्य होते. अग्रवाल यांचे सातारा येथील प्रशिक्षक शिव यादव यांच्यासोबत हा संघ डर्बनला पोहचला. ६ जून रोजी सर्वांनी आराम केला. ७ व ८ जून रोजी दररोज अर्धा तास धावण्याचा सराव केला. ९ जून रोजी सकाळी ५.३० वाजता स्पर्धा सुरू होणार होती. त्यामुळे हे सर्व जण सकाळी ४.३० वाजता स्टार्ट पॉइंटला पोहचले. जितेंद्र अग्रवाल यांनी सांगितले की, तेथील वातावरण अतिशय आल्हाददायक होते. रस्त्याच्या दुतर्फा लोक आम्हाला शुभेच्छा देत होते. संपूर्ण डर्बन शहरातील नागरिक मोठ्या संख्येने तेथे आले होते. ते त्यांच्या भाषेत गाणी गात होते आणि त्यामुळे वातावरणात नवचैतन्य संचारले होते. पहाटे ठिक ५.३० वाजता स्पर्धा सुरू झाली आणि संध्याकाळी ५.३० वाजता पीटरमेरीबर्ग येथे संपन्न झाली. धावताना पूर्ण ८७ किलोमीटर मार्गावर दोन्ही बाजूंनी लोक धावपटूंना प्रोत्साहन देत होते. भारतात जसा गणेशोत्सव उत्साहात साजरा होतो त्यापेक्षाही मोठा सण दक्षिण आफ्रिकेतील लोक कॉम्रेड मॅरेथॉनला साजरा करतात. पूर्ण मार्गावर लोक धावपटूंना पाणी, ज्यूस व खाद्यपदार्थ देत राहतात. या स्पर्धेत १८०० मीटर चढाईचा मार्ग असल्यामुळे पूर्ण चढ चढून पुन्हा उतारावर धावायचे होते. या मार्गावर आजूबाजूचे निसर्गसौंदर्य अत्यंत अविस्मरणीय होते. हिरवेगार, डेरेदार वृक्ष, हिरवळ आणि पक्ष्यांचा किलबिलाट आमचा उत्साह वाढवत होता. ही स्पर्धा केवळ ईश्वराच्या कृपेने व जालनेकरांच्या शुभेच्छांमुळेच पूर्ण करू शकलो, असेही जितेंद्र अग्रवाल यांनी नम्रपणे नमूद केले. स्पर्धेत यश मिळवून त्यांनी परतीचा प्रवास सुरू केला असून १३ जून रोजी ते जालना येथे परतणार आहेत.



**वेदनांवर केली मात**

स्पर्धेच्या अखेरच्या टप्प्यात त्यांच्या उजव्या पायाच्या नसा आखडल्याने त्यांना प्रचंड वेदना होऊन धावणे अशक्य झाले होते. परंतु तरीही हार न मानता श्री गजानन महाराजांचे नामस्मरण करीत ते पुढे गेले आणि जवळच डाव्या बाजूला त्यांना डॉक्टरांचे पथक भेटले. त्यांनी तत्काळ अग्रवाल यांच्या पायाला विशेष पट्ट्या बांधल्या आणि लगेच वेदना थांबल्या. अग्रवाल यांनी मग मागे वळून न पाहता वेळेआधीच स्पर्धा पूर्ण करून भारताचा तिरंगा ध्वज मानाने फडकवला.

# कंत्राटी कामगारांवर बेरोजगारीचे संकट : महेश मेंढे

## कंत्राटी कामगार संघटनेच्या माध्यमातून तुकूम परिसरातील मीटरची पाहणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

वीज ग्राहकांकडे आता 'स्मार्ट प्रिपेड मीटर' लागणार आहे. हे काम अदानींसह एकूण चार खासगी कंपन्यांना देण्यात आले आहे. या मीटरमुळे मीटर रिडिंग, देयक वाटप ही कामे बंद होणार असल्याने ऐन सणासुदीच्यादिवसात कंत्राटी कामगारांवर बेरोजगारीचे मोठे संकट आले आहे.कंत्राटी कामगार संघटनेच्या माध्यमातून तुकूम परिसरातील मीटरची पाहणी केली असतात काही बाबी समोर आल्या आहे.चंद्रपूर शहरासह जिल्ह्यात वीज ग्राहकांना प्रीपेड स्मार्ट वीज मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू असून ही प्रक्रिया रद्द करण्यात यावी यासाठी मोठे जनआंदोलन उभारू असे म्हणत आमच्या योजनेला विरोध असून सदर कारवाई तात्काळ थांबावी असे काँगेसचे महेश मेंढे म्हणाले.यावेळी एम. एस. ई. डी. सी. एल. मीटर रीडर कंत्राटी कामगार संघटना महाराष्ट्र राज्य यांनी सदर जनआंदोलनस पाठिंबा दिला आहे.वास्तविक वीज मीटर निवडी बाबत वीज कायदा २००३ कलम ५५ नुसार ग्राहकांना स्वातंत्र आहे . मात्र वीज वितरण कंपनी कडून स्मार्ट वीज मीटर लावण्यासाठी ग्राहकांच्या घरींगरी सर्व्हे करण्यात येत असून स्मार्ट मीटर लावणे एकप्रकारे बंधनकारक असल्याचे चित्र निर्माण केले जात आहे . ग्राहकांना वेठीस धरण्याच्या महावितरणच्या या धोरणाला आम्ही विरोध दर्शवित आहोत . आधी ही कामे कंत्राटदाराच्या माध्यमातून व्हायची. या कंत्राटदारांनी हजारो कामगारांना यासाठी रोजगार दिला. परंतु स्मार्ट मीटरमुळे आता हे सर्वच कर्मचारी बेरोजगार होणार आहेत. एकीकडे केंद्र व राज्य सरकार राज्यात जास्तीत जास्त रोजगार देण्याची गोष्ट करतात तर दुसरीकडे आम्हाला बेरोजगार केले जात आहे, असा आरोपही कंत्राटी कामगारांनी केला आहे.

यासाठीच आम्ही महेश मेंढे याचे नेतृत्वात जनआंदोलन उभारत असल्याचेही बोलल्या जात आहे.विशेष म्हणजे स्मार्ट मीटरच्या संकल्पनेला राज्यातील वीज संघटनेचा मोठ्या प्रमाणात विरोध आहे.यावेळी एम. एस. ई. डी. सी. एल. मीटर रीडर कंत्राटी कामगार संघटना महाराष्ट्र राज्य यांनी सदर जनआंदोलनस पाठिंबा दिला आहे. महेश मेंढे सोबत सुधीर बारसागडे, मंगेश माणिक खोब्रागडे, सुनील समर्थ, निलेश रामटेके, संदीप घोंगरे, सुशील बोकडे, आनंद टिपले, धम्मदीप दुर्योधन, करण तरारे , अनिल क्षीरसागर, राकेश शिकणम, कुणाल गवई, प्रीतम रायपुरे, मयूर बॉंडबैले, आशिष गेडाम, हेमचंद्र मेश्राम, कुणाल बोरकर, राजू बोरकर, अजहर खान यांची उपस्थिती होती.





**ग्राहकांचे गणित बिघडणार**

शेतीचे वीजग्राहक वगळता घरगुती, व्यापारी, औद्योगिक वीजग्राहकांसह फीडर आणि रोहित्रांवरसुद्धा स्मार्ट मीटर बसविले जाणार आहेत. त्यादृष्टीने ठेकेदाराने फीडर आणि रोहित्रांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. स्मार्ट मीटर बसविल्यावर वीजग्राहकांना मोबाईल फोनप्रमाणे विजेसाठी पैसे भरावे लागतील. किती वीज वापरली, किती रक्कम शिल्लक आहे. याची माहिती ग्राहकांना मोबाईल फोनवर मिळेल. त्यामुळे आर्थिक नियोजनानुसार वीज वापर किती करायचा हेसुद्धा ग्राहकांना समजणार आहे. सध्याच्या पद्धतीत मीटर रिडींग घेऊन मोठे बिल आल्यावर ग्राहकांचे गणित बिघडते.

# अन ग्रामस्थ झाले बोलते;‘जनसंवादातून सुशासनाकडे’ कार्यक्रमात नागरिकांनी मांडल्या समस्या

## पहिल्यांदाच दूरदृष्य प्रणालीद्वारे दुर्गम भागात प्रशासनाचा संवाद;महिलांचा लक्षवेधी सहभाग

## जिल्हा मुख्यालयापासून १५० किलोमीटर अंतरावरील दुर्गम व नक्षलग्रस्त भागातील जनतेशी थेट संवाद

## लोकाभिमूख कामातून जनतेचा विश्वास संपादन करा–जिल्हाधिकारी यांच्या यंत्रणेला सूचना






**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अतिदुर्गम अशा ग्रामीण भागात जेथील अनेक नागरिकांनी आजपर्यंत जिल्हास्तरीय वा तालुकास्तरीय कार्यालय बघीतले नाही, तेथील ग्रामस्थ आज ‘जनसंवादातून सुशासनाकडे’ या नाविन्यपूर्ण कार्यक्रमात प्रशासनाशी बोलते झाले. तंत्रज्ञानाचा वापर करत दूरदृष्यप्रणालीद्वारे दुर्गम भागातील या नागरिकांनी प्रथमच प्रत्यक्ष जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर जिल्हास्तरीय वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधला. सुसंवादाच्या या कार्यक्रमात नागरिकांनी त्यांच्या गावातील विकास कामात प्रशासनाकडून असलेल्या अपेक्षा, येणाऱ्या अडचणी व समस्या मांडून त्या सोडविण्याची साद घातली.

शासनाच्या योजनांची माहिती दुर्गम भागातील तळागाळापर्यंतच्या नागरिकांना व्हावी, या योजनांचा लाभ त्यांना प्रत्यक्ष मिळतो का याची खातरजमा प्रत्यक्ष त्यांचेकडूनच व्हावी, विकास प्रक्रियेत जनसहभाग वाढावा, नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्यांचे तात्काळ निराकरण करणे शक्य व्हावे, तसेच ग्रामस्थांच्या सर्वांगिण विकासाठी प्रशासकीय निर्णय प्रक्रीयेत जनसहभाग वाढावा या उद्देशाने प्रभारी जिल्हाधिकारी विजय भाकरे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या ‘जनसंवादातून सुशासनाकडे’ या अभिनव उपक्रमाला आज नागरिकांचा विशेषत: महिलांचा लक्षणीय प्रतिसाद मिळाला. यावेळी प्रभारी जिल्हाधिकारी विजय भाकरे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, पूनम पाटे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी राहुल मिना, निवासी उपजिल्हाधिकारी सुनिल सुर्यवंशी, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रकाश पाटील, उपजिल्हाधिकारी विवेक साळुंखे, शिक्षणाधिकारी वासुदेव भुते (माध्यमिक), बी.एस.पवार (प्राथमिक), तसेच दूरदृष्य प्रणालीद्वारे संबंधीत तहसिलदार, गटविकास अधिकारी, तलाठी व तालुकास्तरीय यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील दुर्गम भागात मोबाईल नेटवर्क टॉवर उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अहेरी तालुक्यातील रेगुलवाही व येंकाबंडा, भामरागड तालुक्यातून हिंदेवाडा (म) व कारमपल्ली, एटापल्ली तालुक्यातून कमके(घोटसूर) व कोईनदुळ या दुर्गम भागातील ग्रामस्थ जिल्हा प्रशासन यांच्यात संवाद साधल्या गेला. शासन स्तरावर वरिष्ठ कार्यालय व अधिकाऱ्यांमध्ये दूरदृष्य प्रणालीद्वारे नेहमीच संवाद होतो. मात्र प्रथमच अतिदुर्गम भागातील जनतेशी अशा प्रकारे संवाद साधण्यात आला. येथील नागरिकांनी गावातील रस्ते, विज, पाणी, आरोग्य, शाळा, रस्ते डांबरीकरण, पूल, समाजमंदिर, घरकुल याविषयावरील समस्या मांडल्या. महिलांनी देखील आरोग्यविषयक समस्या, गरोदर मातांच्या अडचणी, वडिलोपार्जित मालमत्तेत हिस्सा, मनरेगाअंतर्गत कामे आदी बाबींवर मोकळेपणाने विचारणा करून प्रशासनाशी संबंधीत आपल्या अडचणी मांडल्या. जिल्हाधिकारी यांनी या नागरिकांशी संवाद साधतांना सामुहिक वनहक्क दावे मंजूर झाले का? वनपट्टे किती मिळाले, वनसंवर्धन व वनव्यवस्थापन आराखडा तयार केला का, आधार कार्ड, बँक खाते, रेशन कार्ड, गॅस, जॉबकार्ड आहे का, गरोदर मातांची नोंदणी झाली आहे का, गरोदर मातांना शासनातर्फे बुडीत रोजगाराचे अनुदान मिळते याबाबत आपणास माहिती आहे का आदी प्रश्न विचारून बोलते केले. लहान मूल रडल्याशिवाय आई देखील दूध पाजत नाही त्याचप्रमाणे आपल्या विकासाठी आपले बोलने व समस्या शासनाकडे मांडने आवश्यक असल्याचे श्री भाकरे यांनी ग्रामस्थांना सांगितले. तलाठी ग्रामसेवक यांनी संबंधीत गावातील समस्यांची नोंदवही तयार करून समस्यांचे निराकरणासाठी नियोजन करण्याचे व सर्व ग्रामस्थांच्या सहभागातून विकास आराखडा तयार करण्याचे निर्देशही श्री भाकरे यांनी यावेळी दिले. शासनाच्या योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी लोकाभिमूख कामातून जनतेचा प्रशासनाप्रती विश्वास संपादन करा. विकास प्रक्रीयेत सक्रीय जनसहभाग सुनिश्चित करून जिल्हास्तर ते ग्रामस्तरापर्यत प्रयत्न करून नागरिकांना सक्षम करण्याच्या सूचना त्यांनी यंत्रणेला दिल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह यांनी संवाद साधतांना महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळतो का, आरोग्याच्या काय समस्या आहे आदीबाबत माहिती जाणून घेत संबंधीत शासकीय योजनांची माहिती दिली. काही महिलांनी माडिया भाषेतून आपल्या संवाद साधला. त्याबाबत दुभाषकाकडून माहिती समजवून सांगण्यात आली. सर्व शासकीय योजनांची एकत्रित पुस्तिका तयार करून वितरीत करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या. ‘जनसंवादातून सुशासनाकडे’ या उपक्रमातून दुर्गम आदिवासी भागातील या नागरिकांना बोलते करणे, त्यांच्यामध्ये प्रशासनाप्रति विश्वास निर्माण करणे, शासकीय योजना अंमलबजावणीमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे, त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या निराकरण करण्याचा प्रयत्न करणे महत्वाचे असल्याचे श्री भाकरे यांनी सांगितले. आपल्या हक्काच्या शासकीस योजनांची माहिती जाणून घ्या, आपला आणि आपल्या गावाचा विकास तुमच्याच हाती आहे, हा महत्वाचा संदेश दुर्गम भागात पोहचविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. जनसंवाद कार्यक्रमाला उपरोक्त गाव व नजीकच्या गावातील ग्रामस्थ, स्थानिक ग्रामसेवक, आशा वर्कर, शिक्षक, तलाठी, तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय अधिकारी सहभागी झाले होते.

# जिल्हा सामान्य रुग्णालयात दृष्टीदान दिन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय अंधत्व व दृष्टिक्षिणता नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूरच्या वतीने नेत्रविशारद डॉ. भालचंद्र स्मृती दृष्टीदान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, अति.जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर सोनारकर, अति.निवासी अधिकारी डॉ. बंडू रामटेके, अति जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अविष्कार खंडारे, जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. आडे, डॉ.प्रिती उराडे, डॉ. सरोदे, डॉ.पटेल,डॉ. मेश्राम व जिल्हा कार्यक्रम समन्वयक डॉ. पद्मजा बोरकर आदि उपस्थित होते.यावेळी डॉ. चिंचोळे म्हणाले, नेत्र विशारद डॉ.भालचंद्र हे शासकीय सेवेत असतांना त्यांनी अंधत्व निर्मूलन कार्यक्रमामध्ये ८० हजाराच्या वर मोतीबिंदू शस्त्रक्रिया पूर्ण करून नेत्रहिनांचे जीवन प्रकाशमय केले. तसेच त्यांनी नेत्रदान सारख्या महान कार्याचे महत्व जनसामान्यापर्यंत पोहचविले. त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून १० जून हा दिवस दृष्टिदान दिन म्हणून साजरा केल्या जातो. मृत्युनंतर मानवी डोळे हे सहा तास जिवंत राहतात आणि मरणोपरांत डोळे दान केल्यास इतर अंध नागरिकांना त्याचा फायदा होऊ



त्यांना हे जग बघता येईल, त्यामुळे नागरिकांनी मरणोपरांत दृष्टीदानाकरीता पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वतीने २०२३-२४ करीता मोतिबिंदू शस्त्रक्रियेचे उद्दिष्ट ४५७० असतांना ५०९९ शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून शासकिय संस्थेत मोतिबिंदू शस्त्रक्रियेमध्ये महाराष्ट्रात चंद्रपूरने प्रथम क्रमांक पटकाविला आहे. यामध्ये राष्ट्रीय अंधत्व व दृष्टिक्षिणता नियंत्रण, जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूरच्या टिमने उत्तम कामगिरी केली आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महादेव चिंचोळे यांच्या हस्ते यावेळी नेत्रशल्य चिकित्सक डॉ. सरोदे व डॉ. पटेल यांना शाल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. तसेच नेत्र विभागाच्या सर्व टीमचे अभिनंदन करण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन तुषार रायपूरे यांनी तर आभार डॉ. पद्ममजा बोरकर यांनी मानले. कार्यक्रमाला नोडल अधिकारी श्री. मसराम, नेत्रदान समुपदेशक योगेंद्र इंदोरकर, नेत्रचिकित्सा अधिकारी माधुरी कुळसंगे, श्री. ठुब्रिकर, श्री. मडावी, श्री. भैसारे, श्री. मारशेट्टीवार, अतुल शेंद्रे, सुरज वनकर आदी उपस्थित होते.मरणोपरांत नेत्रदान : निशांत जगन्नाथ बोरकर (वय २१) याचे अल्पशा आजाराने निधन झाले असता नातेवाईकांनी दोन अंधांना दृष्टि मिळेल या उदात्त हेतूने निशांतचे नेत्रदान केले.

# पावणेतीनशे बस धावणार पंढरीची वाट

## राज्यातून पाच हजार बसचे नियोजन

**पुणे । प्रतिनिधी**

आषाढी यात्रेसाठी राज्यातून पाच हजार आणि पुणे विभागाकडून पावणे तीनशे जादा बस सोडण्याचा निर्णय एसटी प्रशासनाने घेतला आहे. स्वारगेट, शिवाजीनगर आणि विभागातील १४ डेपोंतून जादा बस सोडण्याचे नियोजन आहे.

पुणे शहर आणि जिल्ह्यातून आषाढी वारीला पंढरपूरला जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. भाविकांची सोय व्हावी, म्हणून एसटी महामंडळाने आषाढीच्या निमित्ताने पुणे विभागातून २७५ जादा बस सोडण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी मुंबई, रायगड आणि पालघर विभागातून जादा बस मागविण्यात आल्या आहेत. १७ जूनला आषाढी एकादशी ((गेल्या वर्षी १८ लाख भाविकांची सेवा ’एसटी’ महामंडळाने यंदा आषाढी यात्रेसाठी पाच हजार जादा बस सोडण्याचे नियोजन केले आहे. गेल्या वर्षी एसटीने आषाढी यात्रेनिमित्त चार हजार २४५ विशेष बस सोडल्या होत्या. याद्वारे यात्रा काळात १८ लाख भाविकांची सेवा केली होती. यंदा



बसची संख्या वाढल्यामुळे प्रवासी संख्या वाढण्याची शक्यता आहे.)) असून, दोन दिवस आधी बस सोडल्या जातील. आषाढी एकादशीच्या दिवशी २७५ जादा बस सोडल्या जातील. या सेवेचा अधिकाधिक प्रवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे. फुकट्यांना लगाम घालणार यात्रा काळामध्ये गर्दीचा फायदा घेऊन तिकीट न काढता प्रवास करणाऱ्या फुकट्यांना लगाम घालण्यासाठी एसटीने पंढरपूरला जाणाऱ्या विविध मार्गावर १२ ठिकाणी तपासणी नाके उभारण्यात येणार आहे. फुकट्या प्रवाशांवर एसटीचे २०० सुरक्षा कर्मचारी आणि अधिकारी यात्रा काळात २४ तास नजर ठेवणार आहेत. पंढरपुरात चार तात्पुरती स्थानके पंढरपूर यात्रेसाठी राज्यातील लाखो भाविकांसाठी विविध विभागांतून बस सोडण्यात येणार आहेत. वारकरी, भाविक; तसेच पर्यटकांची गर्दी पाहता एकाच स्थानकावर गर्दी होऊ नये यासाठी यात्रा कालावधीत पंढरपूर येथे चंद्रभागा, भीमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज) आणि विठ्ठल या चार कारखाना परिसरात स्थानके उभारण्यात येणार आहेत.

# जागतिक नेत्रदान दिवसाच्या निमित्ताने सर्वांनी नेत्रदानाचा संकल्प करावा :डॉ. मंगेश गुलवाडे

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नेत्रदान पर संवादाचा कार्यक्रम संपन्न

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जागतिक नेत्रदान दिवसाच्या निमित्ताने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे आय डोनेशन मल्टी पर्पज सोसायटीच्या संयुक्त विद्यमानाने नेत्रदानाचा संकल्प करणाऱ्या व्यक्तींचा सत्काराचा कार्यक्रम घेण्यात आला.

त्यानिमित्ताने मा.ना.सुधीर भाऊ मुनगंटीवार पालकमंत्री चंद्रपूर जिल्हा यांचे प्रतिनिधी म्हणून भाजपा जिल्हा महामंत्री डॉ. मंगेश गुलवाडे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने चंद्रपूर महानगरातील नेत्रदानाचा संकल्प करणाऱ्या सुनिता वैद्य,कृष्णा गाईन, शंभू विश्वकर्मा, एड.जनार्दन सुकळी, डॉ.अनुप हस्तक, डॉ.राधिका हस्तक, डॉ. एम.डी. पाल,डॉ. अविनाश दाते, योगेंद्र इंदुरकर, रुपेश डोरले, महिंद्र बाणिक,पी.साबळे, मंदीप बीरेवाल, प्रतीक्षा बिरेवार व कल्पना रावल यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी बोलताना डॉ.मंगेश गुलवाडे म्हणाले की,मरावे परी दृष्टी रुपी उरावे या उक्तीप्रमाणे मरनोप्रांत देखील आपण जिवंत राहू शकतो व सर्व सृष्टी पाहू शकतो आणि अवयव दानात श्रेष्ठदान




असणाऱ्या नेत्रदानाचा सर्वांगीण संकल्प करावा असे आवाहन केले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना चंद्रपूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी या नेत्रदानावर आयोजित केलेल्या जनजागृती पर कार्यक्रमाची गरज असल्याचे प्रतिपादन केले आणि उपस्थित असणाऱ्या नागरिकांनी नेत्रदानाचे आरोग्य दूत म्हणून समाजामध्ये नेत्रदानाचा प्रचार व प्रसार करावा असे सूचक वक्तव्य केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ.राजेश सुरपाम यांनी आय डोनेशन मल्टीपर्पज सोसायटी या संस्थेची प्रशंक्षा केली, तसेच उपस्थित असणाऱ्या तृतीय वर्षीय एम.बी.बी.एस.च्या विद्यार्थ्यांना नेत्रदान संबंधी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन डॉ. सपन दास (अध्यक्ष आय डोनेशन मल्टीपर्पज सोसायटी) यांनी केले.कार्यक्रमाचे संचालन डॉ. प्रीती उराडे तर डॉ. सपण दास यांनी आभार मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पारितोषिक मिस्त्री,मि.पंकज, योगेंद्र दांडेकर यांनी अथक परिश्रम घेतले.

# विरोधी पक्षनते विजय वडेट्टीवारांच्या आश्वासनानंतर सरपंचाचे उपोषण मागे

## चौकशी करून कारवाईचे आदेश–गावगुंडांच्या त्रासाने पत्करला उपोषणाचा मार्ग

**सिंदेवाही । प्रतिनिधी**

तालुक्यातील मरेगाव (तुकुम) येथील सरपंच संदीप बाबुराव ठाकरे यांनी गावगुंडाकडून ग्रामपंचायतीच्या कचरा कुंड्या मालमत्तेची तोडफोड, वारंवार धमक्या व झालेले हल्ले या विरोधात पोलिसात तसेच पंचायत समिती स्तरावर लिखित तक्रार देऊ नये कारवाई न झाल्याने दि.१२ जून पासून आमरण उपोषण सुरू केले. याची माहिती मिळताच आज मतदारसंघाच्या दौऱ्यावर असताना राज्याचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी उपोषण मंडपात भेट देऊन सरपंच संदीप ठाकरे यांच्या समस्या जाणून घेत संबंधित विभागांना तात्काळ चौकशी करून कारवाईचे निर्देश दिले. सदर आश्वासनानंतर सरपंच ठाकरे यांनी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते नींबू पाणी घेऊन उपोषण मागे घेतले.

आपले गाव स्वच्छ व सुंदर तसेच निरोगी राहावे याकरिता सिंदेवाही तालुक्यातील मरेगाव (तुकुम) येथील सरपंच संदीप ठाकरे यांनी ग्रामपंचायत अंतर्गत गावात कचराकुंड्या तयार केल्या. मात्र गावातील काही समाजकंटकांनी त्याची तोडफोड केली. सोबतच गावातील मुख्य पानंद रस्त्यावरुन वाळू वाहतूक करणारे अवजड वाहने जाऊन रस्त्याची दुर्दशा करण्यात आली. तरी या विरोधात आवाज उठवणाऱ्या सरपंच संदीप ठाकरे यांचे वर सलग दोनदा हल्ला झाला. याची वारंवार तक्रार पंचायत समिती स्तरावर तसेच पोलिसात देऊनही कुठलीही कारवाई न झाल्याने व गाव गुंडांकडून जीविताचा संभावित असल्याने अखेर न्यायासाठी सरपंच ठाकरे यांनी उपोषणाचा मार्ग पत्करला. त्यांनी कालपासून सिंदेवाही पंचायत समिती तथा तहसील कार्यालय परिसरात आमरण उपोषण सुरू केले. याची माहिती मिळताच आज राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मतदार संघातील दौरा दरम्यान थेट उपोषण मंडपाला भेट दिली व सरपंच संदीप ठाकरे यांच्या समस्या जाणून घेत सदर मागण्यांची सखोल चौकशी करून खड्डेमय मार्गांची दुरुस्ती, व संपूर्ण मागण्यांची पूर्तता करावी असे वेळीच निर्देश दिले. यावर समाधान व्यक्त करीत मरेगाव (तुकुम )सरपंच संदीप ठाकरे यांनी विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांच्या आश्वासनानंतर उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी लिंबू पाणी घेऊन उपोषण मागे घेतले.याप्रसंगी प्रामुख्याने सिंदेवाही तहसीलदार पानमंद, सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार चव्हाण, पंचायत समिती विभागाचे अधिकारी, सिंदेवाही नगराध्यक्ष स्वप्निल कावळे, माजी प.स. सदस्य राहुल पोरेड्डीवार, तालुका सरपंच संघटना अध्यक्ष राहुल बोडने, कृउबा संचालक नरेंद्र भैसारे, जानकीराम वाघमारे, सचिन नाडमवार व बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.





# पुलगावच्या श्रावणी ढोमणेचा शोधनिबंध प्रकाशित

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्प्रिंगर पब्लिशर्स, नेदरलँड यांनी श्रावणी संदीप ढोमणे यांचा शोधनिबंध प्रकाशित केला आहे.

प्रो. डॉ.गणेश येनूरकर, प्रा. डॉ.संदीप माळ, प्रा. डॉ.निलेशसिंग ठाकूर, कु. श्रावणी अरुणा संदीप ढोमणे, कु. मेरुला धुर्वे, मयंक पटेल, करण कुलमेती आणि हर्ष धुर्वे यांनी लिहिलेला DipLuc: A Convolutional Neural Network Pretrained Model for Microscopic Cell Images Based Leukemia Cancer Analysis हा शोधनिबंध स्प्रिंगर पब्लिशर्स, नेदरलँडच्या मल्टी मीडिया टूल्स अँड ऍप्लिकेशन जर्नल मध्ये प्रकाशित झाला आहे. १२ जून २०२४ रोजी. हा शोधनिबंध SCIEE Am{U Scopus डेटाबेसमध्ये अनुक्रमित केला आहे, जो आजच्या संशोधनातील एक महत्त्वाचा साधन आहे.



कु. श्रावणी संदीप ढोमणे, कु. मेरुला धुर्वे, मयंक पटेल, करण कुलमेती आणि हर्ष धुर्वे, त्यांच्या अभियांत्रिकी पदवीच्या (इ.ए.) संगणक तंत्रज्ञानाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या गटाने २०२३ मध्ये यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर येथे मोठ्या प्रकल्पात हे संशोधन कार्य पूर्ण केले. . लंडनमध्ये शिकणारी विद्यार्थीनी श्रावणी संदीप ढोमणे यांनी या ग्रुपचे नेतृत्व केले तर प्रा. मार्गदर्शक म्हणून डॉ.गणेश येनूरकर व प्रा. डॉ.निलेशसिंग ठाकूर यांनी विद्यार्थ्यांसोबत मूल्यमापनकर्ता म्हणून काम पाहिले. या आश्चर्यकारक कामगिरीबद्दल सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे सर्व विभागातून अभिनंदन होत आहे.

# इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी शासनाच्या बीज भांडवल, थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, महामंडळामार्फत इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी करीता शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजनेकरीता उद्दीष्ट निश्चित केले आहे. या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.

२० टक्के बीज भांडवल योजना : सदर योजना राष्ट्रीयकृत बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातून राबविण्यात येते. महामंळाचा सहभाग २० टक्के, लाभार्थी सहभाग ५ टक्के व बँकाचा सहभाग ७५ टक्के असतो. या योजनेमध्ये महत्तम प्रकल्प मर्यादा ५ लक्ष रुपये आहे. महामंडळाच्या कर्जावरील व्याजाचा दर ६ टक्के असून परतफेडीचा कालावधी ५ वर्ष इतका आहे. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे असावे. कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु १ लक्ष रुपयांपर्यंत असावी.१ लक्ष पर्यंतची थेट कर्ज योजना : अर्जरादाचे वय १८ ते ५५ वर्षे असावे. अर्जदाराचा सिबील क्रेडिट स्कोअर किमान ५०० इतका असावा. अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ग्रामीण व शहरी भागाकरीता १ लक्ष रुपये. लाभार्थींचा सहभाग निरंक राहील. नियमित ४८ समान मासिक हप्त्यांमध्ये मुद्दल २०८५ रुपये परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज अदा करावे लागणार नाही. परंतु थकित झालेल्या हप्त्यांवर द.सा.द.शे. ४ टक्के व्याजदर आकारण्यात येईल.वैयक्तिक कर्ज व्याज परतावा १० लक्ष पर्यंतची कर्ज योजना : महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्गीय प्रवर्गातील गरजू व कुशल व्यक्तींना कृषी संलग्न व पारंपारिक उपक्रम, लघु उद्योग व मध्यम उद्योग, उत्पादन, व्यापार व विक्री, सेवा क्षेत्र, इ. व्यवसायाकरीता कर्ज व्याज परतावा उपलब्ध करुन देणे. महामंडळाच्या पोर्टलवर नाव नोंदणी व अर्ज सादर करणे अनिवार्य. बँकेमार्फत लाभार्थींना १० लक्ष रुपयांपर्यंत कर्ज वितरित केले जाईल.कर्ज रक्कमेचे हप्ते नियमित भरल्यास व्याजाची रक्कम १२ टक्क्यांच्या मर्यादित व्याज परतावा रक्कम अनुदान स्वरुपात बँक प्रमाणिकरणानुसार लाभार्थीच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. लाभार्थ्यांने ऑनलाईन पोर्टलवर उद्योग सुरु असल्याचे किमान दोन फोटो अपलोड करावेत. अर्जराचे वय १८ ते ५० वर्षे असावे. कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लक्ष रुपयांपर्यंत असावी.

# बालगृहात व्यक्तिमत्व विकास शिबीर व मार्गदर्शन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शिक्षण विभाग व पोलीस विभागाद्वारे स्वामी विवेकांनद बालगृह,राजुरा येथे व्यक्तिमत्व विकास शिबीर व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन करण्यात आले.

जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय, चंद्रपुर अंतर्गत जिल्हयात बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ नुसार शासकीय व स्वयंसेवी बालगृहामध्ये काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके जसे अनाथ, बेवारस, परित्यागीत, हरविलेले, बालकांना बाल कल्याण समिती, चंद्रपूर यांचे आदेशान्वये दाखल करण्यात येते. बालकांना आता उन्हाळी सुट्टया लागल्या असून या वेळामध्ये बालकांना प्रत्येक आठवडयातून दोन ते तिन दिवस व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम, सुप्त गुणांना चालना देणारे कार्यक्रम, कला कार्यानुभव विषयक मार्गदर्शन मिळाले तर बालकांचे विषयातील अडचणी कमी होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढेल. तसेच त्यांचा वेळ योग्य कामासाठी उपयोगी पडेल यासाठी शिक्षण विभागाला विनंती करण्यात आली होती.त्यानूसार स्वामी विवेकांनद बालगृह, राजुरा येथे राजुराचे गटशिक्षणाअधिकारी मनोज गौरकर, शिक्षण विस्तार अधिकारी संजय हेडाऊ, विशेष साधन व्यक्ती राकेश रामटेके यांनी प्रवेशित मुलांना व्यक्तिमत्व विकास, अभ्यास कसे करावे या बाबत मार्गदर्शन केले. मनोज गौरकर यांनी मुलांना लागणारे पूर्ण शालेय साहित्य व शिक्षणाकरीता इतर साहित्य लागल्यास गटशिक्षणाधिकारी कार्यालय, राजुरा येथुन मोफत पुरविण्यात येईल व प्रवेशित मुलांना इंग्लीश स्पीकिंग, संगीत, चित्रकला क्लासेस, खेळांचे कोचिंग व अडचणी आलेल्या विषयाचे मोफत कोचिंग देण्यात येईल, असे सांगितले.होमगार्ड तथा शारिरीक शिक्षक मार्गदर्शक नागेश जाधव यांनी मुलांना पोलिस भर्तीसाठी फिजीकल करीता मोफत प्रशिक्षण देणार असे सांगितले. पोलिस उपनिरीक्षक नरेश उरकुडे यांनी मुलांना पोलिस भर्ती व स्पर्धा परिक्षा बाबत मार्गदर्शन केले. शिक्षण विभागामार्फत असे शिबीर चंद्रपूर जिल्हयाचे इतर बालगृहात गटशिक्षणाधिकारी कार्यालय मार्फत घेण्यात येणार आहे.सदर कार्यक्रमात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी दीपक बानाईत यांच्या मार्गदर्शनात जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय आर साखरकर, प्रिती उंदिरवाडे, सचिंद्र नाईक, भाऊराव बोबडे, प्रविण गेडाम आदी उपस्थित होते.

# आरटीओ कार्यालयातील सफाई कामकाजा साठी सेवा पुरविण्याबाबत दरपत्रके आमंत्रित

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, चंद्रपूर येथील साफसफाई कामकाजाकरिता पुढील ११ महिन्याच्या कालावधीसाठी सेवा करार करण्यासाठी या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्दीपत्रक अटी व शर्तीसह प्रसिध्द करण्यात आले आहे.

या कार्यालयातील साफसफाईचे कामकाज कंत्राटी पध्दतीने करण्यासाठीचे विहित नमुन्यातील दरपत्रक दि.२५ जून २०२४ पर्यंत मोहोरबंद लिफाफ्यामध्ये प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, जलनगर, चंद्रपूर येथे प्रत्यक्ष जमा करावीत किंवा पाठवावीत. मुदतीनंतर प्राप्त दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच दरपत्रके मंजूर अथवा नामंजूर करण्याचे सर्व अधिकार या कार्यालयाकडे राहतील, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे यांनी कळविले आहे.

# जि.प.च्या अर्थसंकल्पात शिक्षण,कृषी, आरोग्य आणि पायाभूत सुविधांवर विशेष भर

## सन २०२४-२५ च्या मुळ अर्थसंकल्पास सर्वसाधारण सभेत मंजुरी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकात २८ कोटी ११ लक्ष रुपयांचा महसुली उत्पनाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. या अर्थसंकल्पात जिल्ह्यातील ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य देण्यात आले असून जिल्हा परिषदेच्या विविध विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांनवर भरघोस आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. यात शिक्षण, कृषी, आरोग्य, महिला व बालकल्याण, पाणी पुरवठा आदींचा समावेश आहे.

शिक्षण विभाग : अर्थसंकल्पात या विभागाकरीता १ कोटी ३ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली असून यामध्ये विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन उंचावण्याकरीता इसरो (खडठज/इ-ठउ) सारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वैज्ञानिक संस्थांना भेटी करीता सहलीचे आयोजन करण्याचे नियोजित आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या नाविण्यपूर्ण संकल्पनेतून मिशन भरारी ३.० राबवून जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेकरीता तयार करण्यावर भर देण्यात आला आहे. शालेय क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धेची जाणीव निमार्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

आरोग्य विभाग : जि.प. आरोग्य विभागासाठी ४ कोटी १० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये साथरोग, ग्रामीण भागातील गरजू लोकांना मोफत नेत्र तपासणी शिबीर व चष्मे वाटप करणे, दुर्धर आजाराने पिडीत व्यक्तींना शस्त्रक्रिया व औषधोपचार करीता अर्थसहाय्य, ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना सुविधायुक्त करून सुसज्ज करण्यावर भर देण्यात आला.

महिला व बालकल्याण विभाग : या विभागाकरीता १ कोटी ४ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली असून यामध्ये अंगणवाडी केंद्राचे बळकटीकरण व लहान मुलांच्या शारीरिक विकासाकरीता बाहय परिसरात खेळणी बसविणे, अंगणवाडी केंद्रातील ६ महिने ते ३ वर्ष व ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील मुला/ मुलींना अंगणवाडी केंद्रामार्फत पोषण आहार उपलब्ध करून कुपोषण टाळण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. ग्रामीण भागातील महिलांना/ मुलींना सक्षम करण्याकरीता जुडो कराटे, ब्युटी पार्लर, संगणक प्रशिक्षण, शिवणकाम, सायकल वाटप या सारख्या योजना राबवून महिला सक्षमीकरणावर भर देण्यात आला आहे.

समाजकल्याण विभाग : या अंतर्गत मागासवर्गीयांकरीता विविध प्रकारच्या वैयक्तीक लाभाच्या योजना व दिव्यांग कल्याणासाठी ३ कोटी रुपयांची तरतूद आली आहे. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती करीता तरतूद करण्यात आली आहे.

कृषी विभाग : जि.प.च्या अर्थसंकल्पात कृषी विभागासाठी १ कोटी ११ लक्षाची तरतूद करण्यात आली असून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना जैविक शेती करीता प्रोत्साहित करून शेतीच्या उत्पन्न वाढीवर भर देण्यात आला आहे. ग्रामीण भागातील तलाव दुरुस्ती व सौंदर्यीकरणाकरीता रुपये १ कोटी ४० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

बांधकाम विभाग : या अंतर्गत ग्रामीण भागातील विकास कामाकरीता ४ कोटी १७ लक्ष रु. च्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाअंतर्गत प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्तीच्या माध्यमातून गावांना शुद्ध पाण्याचा पुरवठा व्हावा, याकरिता २ कोटी ८ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली असून सोबतच पाणी टंचाईकरीता बोरवेल व हातपंपाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्याचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) यांनी कळविले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .